पुण्य नगरी

# महाविद्यालयीन युवतीची ‘सायबर गुन्हेगारी’ जनजागृती मोहिम

**वडूथ / प्रतिनिधी**

केबीपी कॉलेजच्या बीसीए च्या विद्यार्थीनी समृध्दी जगताप व वैष्णवी शिर्के यांनी सायबर गुन्हेगारी प्रतिबंध होण्यासाठी सी. एस. कॉलेज, डी.जी. कॉलेज, वडूथ, निमसोड, रहिमतपुरसह इतरही शाळामधून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचा उदाहरणासह मार्गदर्शन केले असून ही मोहिम सुरु आहे.

आज देशामध्ये दरोडे, जबरी चोरी, घरफोडी चारी, इतर चो-या होवून जेवढी मालमत्ता चोरीस जाते त्याच्या कित्तेक पटीने सायबरच्या माध्यमातून नित्याने गुन्हे घडून बँकेतील खातेदारांची अकौंट रिकामी होत आहेत. अनेक मुले, मुली फसव्या जाहीरातील बळी पडत आहेत. अशाप्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगार बहुतेक उच्चशिक्षीत व परराज्यातील आहेत. खोटया वेबसाईट, फेक अकौंट, फेक लिंक पाठवून अनेकांचे बँक अकौंटमधील पैसे काहीक्षणात हडप केले जात आहेत. या क्षेत्रातील गुन्हेगार रोज नवनवीन आयडीया शोधून तुमचे एटीएम बंद आहे, पॅन कॉर्ड बंद आहे, लाईट बिल थकले आहे, तुम्हाला बक्षीस लागले आहे, तुमचा मोबाईल नंबर लकी आहे, तुमचे क्रेडीट कार्ड बंद पडले आहे, तुम्हाला मोठी रक्कमची ऑफर आहे वगैरे अनेक पध्दती वापरुन अशा प्रकारची फसवणूक सर्रास चालू आहे.



समृध्दी जगताप व वैष्णवी शिर्के यांचे स्वागत करताना मान्यवर

यामधून सर्वसामान्य लोक, डॉक्टर, प्राध्यापक, रिटायर्ड अधिकारी सुध्दा या मोहातून सुटलेले नाहीत अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च वर्ये आणि क्रिक हिल फाऊंडेशन यांच्या वतीने व संचालक डॉ. बी. एस. सावंत, डॉ. आर.बी. कुंभार, प्रा. पी.ए. लोखंडे यांच्या मार्गदर्शनखाली बीएसीए च्या विद्यार्थीनी समृध्दी जगताप व वैष्णवी शिर्के यांनी मोहिम होती घेतली आहे.

त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, वडूथ ता. सातारा येथे दोन सत्रामध्ये सोशल मिडीयावर होणारे गुन्हे, बँक घोटाळे, फेक कॉल कसे टाळावेत, आपला पासवर्ड स्ट्रॉंग कसा असावा याबाबत जवळपास ५०० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत विशेष माहिती दिली.

नमुद विद्यार्थ्यांनी हाती घेतलेली मोहिम व त्यांचे प्रेजेंटेशन पाहून उपस्थितीत शिक्षक वर्ग तसेच ग्रामस्थ यांनी त्यांचे कौतुक केले.

Satara Edition
Aug 28, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com